ISSN 2231-6671
International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# Hi-TECH RESEARCH ANALYSIS

EDITOR IN CHIEF
DR. BALAJI KAMBLE

IMPACT FACTOR
5.80

ISSN 2231- 6671

*International Registered & Recognized*
*Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# Hi-TECH RESEARCH ANALYSIS

UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue : XVI, Vol. - IV
Year - VIII, (Half Yearly)
Aug. 2018 To Jan. 2019

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382 - 241913
09423346913 / 09503814000
07276305000/ 09637935252

**Website**
**www.irasg.com**

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published by :**
JYOTICHANDRA PUBLICATION
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

Price : ₹ 200/-

**CHIEF EDITOR**

Dr. Balaji G. Kamble
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur.(M.S.) (Mob. 09423346913)

**EXECUTIVE EDITORS**

Dr. Sunanda Rodge
Principal
Govt. B.Ed. College,
Nanded, Dist. Nanded (M.S)

Scott. A. Venezia
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

Dr. Omshiva V. Ligade
Head, Dept. of History
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

Bhujang R. Bobade
Director Manuscript Dept.,
D. A. & C. Research Insititute,

Dr. Dileep S. Arjune
Professor & Head, Dept. of Economics
J. E. S. College,
Jalna, Dist. Jalna(M.S.)

Dr. U. Takataka Mine
Tokiyo (Japan)

Dr. Babasaheb M. Gore
Dean- Faculty of Education & M.C.
Member,S.R.T.M.U, Nanded.(M.S.)

Dr. Nilam Chhanghani
Dept. of Economics,
KNG Mahavidyalaya
Karanja Lad, Dist. Washim (M.S.)

**DEPUTY-EDITOR**

Dr. G . V. Menkudale
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

Dr. C.J. Kadam
Head, Dept. of Physics,
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

Dr. Balaji S. Bhure
Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

Dr. Bharat S. Handibag
Dean, Faculty of Arts,
Dr. B.A.M.U. Aurangabad(M.S).

Dr. S.B. Wadekar
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

Dr. Shivaji Vaidya
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani , Dist. Parbhani.(M.S.)

**CO-EDITORS**

Dr. R.N. Salve
Head, Dept. of Sociology,
Shivaji University,
Kolhapur, Dist. Kolhapur.(M.S.)

Ghansham S. Baviskar
Dept. of English,
RNC & NSC College,
Nasik, Dist. Nasik.(M.S.)

Dr. Kailash Tombare
Head, Dept. of Economics,
Devgiri Mahavidyalaya,
Aurangabad.(M.S.)

Dr. Kailash R. Nagulkar
Head, Dept. of History,
Gulab Nabi Azad College,
Barshi Takli, Dist. Akola.(M.S.)

Issue : XVI, Vol. IV
HI-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 5.80
ISSN 2231- 6671
Aug. 2018 To Jan. 2019

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | R. C. Dutt Thoughton Famines: Nature, Causes, Effects & Policy<br>**Dr. Ankush L. More** | 1 |
| 2 | Women and Space: A Study of Africa as Depicted by African Women Writers<br>**Puja Sarmah** | 10 |
| 3 | पत्रकारिता : जिम्मेदारी एवं चुनौतियाँ<br>**डॉ. आलीया मेराज सय्यद** | 15 |
| 4 | इसीस आणि भारताची राष्ट्रीय सुरक्षा<br>**डॉ. सुभान तुळशीराम जाधव** | 18 |
| 5 | दादाभाई नौरोजींचे आर्थिक विचार<br>**डॉ. आर. डी. जाधव** | 26 |
| 6 | गंगाधर गाडगीळ यांच्या कथांतील आशय आणि नवता<br>**डॉ. साधना द. जाधव** | 31 |
| 7 | आदिवासी जमातीच्या लोकगीतातील स्त्रीचे सामाजिक व सांस्कृतिक दर्शन<br>**डॉ. शिवानंद मच्छिंद्र गिरी** | 36 |
| 8 | भ्रष्टाचार मुक्तिच्या दृष्टिकोनातून संत तुकारामाच्या अभंगाची उपयुक्तता<br>**रामचंद्र ना. परत्तापुरे** | 43 |
| 9 | 'यज्ञकुंड' मधील सामाजिक जाणीव<br>**डॉ. उन्मेश शेकडे** | 46 |
| 10 | ई-प्रशासनाच्या साहाय्याने सार्वजनिक तक्रारींचे निवारण<br>**डॉ. के.जी. राठोड** | 50 |
| 11 | जम्मू-काश्मीर : एक विवादित प्रश्न<br>**डॉ. के.जी. कुंभारकर** | 55 |

6

# गंगाधर गाडगीळ यांच्या कथांतील आशय आणि नवता

डॉ. साधना द. जाधव
सहयोगी प्राध्यापक (मराठी)
एच.बी.टी. कला वाणिज्य महाविद्यालय,
नवीन सुभेदार ले-आऊट, नागपूर

## Research Paper - Marathi

कथेद्वारे कथाकाराला जे ध्वनित करावयाचे असते, जो मथितार्थ सांगावयाचा असतो, तो त्या कथेचा आशय असतो. प्रस्थापित परंपराप्रिय कथाकारांना जाणवलेल्या जीवनप्रत्ययापेक्षा वेगळा जीवनप्रत्यय नवकथाकारांना येतो, तेव्हा तो प्रत्यय आणि त्यावरील त्याचे वेगळे भाष्य तेव्हा कथेतून प्रगट होते, तेव्हा त्या कथेत आशयगत नवता येते.

सुरूवातीला मराठी कथा ही आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही संदर्भात साचेबंद झालेली होती. विषयांच्या निवडीमध्ये व ते विषय अभिव्यक्त करण्यामध्ये जो तोचतोचपणा आलेला होता, त्याला नाकारून स्वतःचा नवा दृष्टिकोन व नवा आशय नवकथाकारांनी आपल्या कथांतून व्यक्त केला. म्हणजेच या कथाकारांनी विषयाच्या संदर्भात नवे आकलन प्रस्तुत करून त्याला जीवनासंबंधीचा एक नवा अर्थ दिला.

गंगाधर गाडगीळांनी पारंपरिक लघुकथेची चौकट मोडून, जाणीवपूर्वक व बेडरपणे नवनवे प्रयोग करून कथेच्या रंगरूपांची कल्पनाच बदलून टाकली. त्यांनी कथेला सर्वांगाने नवे रूप दिले. आजच्या उद्ध्वस्त विश्वात वावरणाऱ्या संवेदनशील कृतींना खोलवर जाणवणारी खिन्नता, जहरीपणा, तिटकारा, स्वतःला त्रास करवून घेण्याची तीव्र इच्छा, उपरेपणाची भावना यांचे नवे रसायन गाडगीळांनी बनविले व ते व्यक्त करण्यासाठी कथेचा आशय, भाषाशैली, निवेदनशैली, पात्रचित्रण, संवाद, प्रतिमासृष्टीत त्यांनी मूलगामी परिवर्तन घडवून आणले.

"माणूस आपल्या मनातील गूढशक्तींचा जसा गुलाम असतो, तसा समाजातील गूढशक्तींचादेखील असतो. हे सर्व नवकथा–लेखकांनाच पाहिल्याने सापडले आहे अशातला भाग नाही. समाजशास्त्रज्ञांना ते फार दिवस माहीत आहे. पण त्यांची जाणीव होऊन नवीन आशय असलेल्या कलाकृती नवकथाकरांनी निर्माण केल्या आहे."[1] गाडगीळांनी म्हटल्याप्रमाणे मानवी जीवनातील अनुभवाचे चित्रण त्यांनी जाणिवेच्या आणि नेणिवेच्या या दोन्ही पातळ्यांवरून केले आहेत. त्यांच्या कथेत व्यक्तीच्या अंतर्मनाला महत्त्व

असल्यामुळे त्यांच्या कथेतील आशय एक पदरी न राहता तो अनेक पदरी होतो.

गाडगीळांच्या कथेत आशयाची विविधता असली तरी त्यांनी मध्यमवर्गीय समाजात परिस्थितीमुळे रूढी परंपरेच्या मनावर असलेल्या पगड्यामुळे, दारिद्र्यामुळे, यंत्रवत झालेल्या आयुष्यामुळे, त्यांचे अंतःकरण दुःखाने ओसंडून वाहात आहे. त्यांच्या मनातील सुप्त आशाआकांक्षा, त्यांच्या दडपलेल्या भावनामुळे त्यांच्यात निर्माण झालेली विकृती अशा दुबळ्या व व्यथित मनाचे चित्रण गाडगीळांच्या कथेत मोठ्या प्रमाणात दिसून येते. त्याचप्रमाणे कामप्रेरणा, मनोविकृती, जीवनातील बीभत्सता, कुरूपता, मंगल–अमंगल, सुष्ट–दुष्ट याचेही चित्रण त्यांनी आपल्या कथेत केले. तसेच प्रथापित मूल्यव्यवस्थेविरूद्धच्या असंतोषही त्यांनी आपल्या कथेतून व्यक्त केला.

गाडगीळांच्या कथेत स्त्रीपुरुष हे दोन्ही घटक सारखेच महत्त्वाचे असले तरी त्यांच्या कथेतून पुरुषांच्या तुलनेत स्त्रीची बहुविध रूपे दिसून येतात. विवाहित, अविवाहित, विधवा, नवऱ्याने टाकलेल्या, नवऱ्याचे घर सोडून आलेल्या बंडखोर, कलावंत, कावेबाज, भोळ्याभाबड्या, वेगवेगळ्या प्रकारच्या मानसिक, लैंगिक, शारीरिक दमनाने बळी पडलेल्या स्त्रियांचे जीवन गाडगीळांच्या अनेक कथांचे आशयसूत्र आहे. मध्यमवर्गीय स्त्रियांच्या मानसिकतेचे व त्यांच्या जीवनसंस्कृतीचे, त्यांच्यावर असलेल्या परंपरेच्या जोखडाचे विविध अंगाने त्यांनी अनेक कथांतून चित्रण केलेले आहे. (सरळ रेषा, भागलेला चांदोबा, पिवळा गुलाब, भांडण) अश स्त्रियांचे चित्रण त्यांनी अतिशय सहानुभूतीने केलेले आहे.

गाडगीळांच्या कथेतील बहुतेक सर्वत्र प्रौढ कुमारिका नोकरी करणाऱ्या आहेत. काही प्रौढ आहेत पण त्या कुमारिका नाहीत. त्या आपल्या वासना दडपून न टाकता स्वैरपणे लैंगिक सुखाचा आनंद घेणाऱ्या आहेत. तर कुणी आपल्या मादक शरीराचा वापर करून पुरुषजातीवर चेटूक करणारी आहे. अशा नटव्या, बदफैली, पैशाला चटावलेल्या (तीन तऱ्हा) प्रौढ पण कुमारिका नाही अशा स्त्रिया त्यांच्या कथेचा विषय असल्या तरी काही प्रौढ कुमरिकांच्या आयुष्यातील समस्यांनाही त्यांनी कथेचे विषय बनविले आहे. ('बलात्कार', 'विपरित', 'नाही ! नाही !'

पारंपारिक कुटुंबव्यवस्थेत विधवा, घटस्फोटिता, परित्यक्ता स्त्रिया म्हणजे लांच्छास्पद. त्यातही विधवा स्त्रिया म्हणजे समाजासाठी लांच्छनास्पद आयुष्य वाट्याला आलेली (कडू आणि गोड) परंतु काही विधवा नोकरी करून आपल्या सुखाच्या वाटा शोधतात व आपले आयुष्य आनंदी बनवितात. (भागलेला चांदोबा, चुंबन) हा वेगळा विषयही त्यांनी कथेतून दृग्गोचर केला. परित्यक्ता स्त्रीची समाजात काय किंमत असते, तिला कोणकोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते, ह्या समस्येलाही त्यांनी आपल्या कथेचा विषय बनविले ('विरलेली जादू', 'तुटलेली').

आपल्या स्वातंत्र्याच्या व अधिकाराच्या गोष्टी करणारी सुशिक्षित स्त्रीही शेवटी पुरुषाच्या मानसिकतेत रुतून बसलेल्या वर्चस्व भावनेला कशी शरण जाते व ती विवाहित असल्यामुळे तिच्यासमोर कोणकोणते पेचप्रसंग उभे राहतात हेही त्यांच्या कथेत आढळते (भांडण) गाडगीळांनी मानवी भावसंबंधाचे, मानवी जीवनाचे दर्शनच विशेषतः आपल्या कथांतून घडविलेले आहे.

मुंबईतील वेश्यावस्ती हा लेखकांसाठी महत्त्वाचा विषय; पण गाडगीळांनी 'बकुळा' व्यतिरिक्त 'पाच रुपये' ही कथा लिहिली; पण ती संपूर्ण वेश्याजीवनावर नाही. 'बकुळा' मधून मात्र वेश्यांचे भोग काय असू शकतात याचे दर्शन घडविलेले आहे.

मानवी जीवनात कामवासना ही मूलभूत प्रेरणा असूनही, त्याच्यावर झालेले लिखाण उत्तान, कामुक, शृंगारिक समजल्या जाते आणि स्त्रियांच्या बाबतीत तर कामवासना म्हणजे निषिद्ध विषय समजला जातो. गाडगीळांनी एक मूलभूत प्रेरणा या नात्याने कामवासनेला आपल्या कथेचा विषय बनवले व त्यावर फार टीकाही झाली (उंट आणि लंबक).

गाडगीळांनी स्त्रियांच्या शारीरिक, मानसिक, भौतिक, नैतिक पातळ्यांवरील शोषणाला तसेच त्यांच्या दुःखभोगाला आपल्या कथेचे आशयसूत्र बनविले. आणि याला संदर्भ ते त्यांच्या आईचा पिचून पिचून झालेला मृत्यू देतात. स्त्रियांच्या दुःखाचा आविष्कार बघून असे वाटते की, गाडगीळांनी स्वतः हे दुःख अनुभवले असावे, इतके ते वास्तव वाटते.

गाडगीळांनी ज्या काळातले हे स्त्रीचित्रण केलेले आहे, त्या काळात स्त्रियांची परिस्थिती बहुधा अशीच असावी. त्यांनी त्या मध्यमवर्गीय, कनिष्ठ मध्यमवर्गीय स्त्रियांना आपल्या कथेचे विषय बनविले, त्या स्त्रिया सतत पुरुषी वर्चस्वाखाली असत. त्यामुळे त्या गांजलेल्या, दुःखी, आर्थिक स्वालंबन नसल्यामुळे हताश, दुबळ्या, आणि दुसरा कोणताही पर्याय नसल्यामुळे सतत मानसिक दडपणाखाली असलेल्या मूकनायिका वाटतात. गाडगीळांनी आपल्या कथेत व्यक्तीच्या मनाला केंद्रवर्ती ठेवल्यामुळेच इतक्या विविध प्रकारे स्त्रियांच्या मानसिकतेचे ते चित्रण करू शकले.

गाडगीळ स्वतः मुंबईकर असल्यामुळे मुंबई ही गाडगीळांच्या बहुशः कथांची भूमी दिसून येते. त्यांच्या अनेक कथांतून मुंबईच्या चाळीतील चित्रे येतात व त्या अनुषंगाने त्यात राहणाऱ्या मध्यमवर्गीय स्त्रियांच्या समस्यांचेही ('पिवळा गुलाब'). मुंबईतल्या उच्चवर्गातील स्त्रियांच्या ('उंट आणि लंबक', 'लक्तरे') विचारसरणीला, मानसिकतेलाही ते आपल्या कथेचे आशयसूत्र बनवितात.

खेड्याच्या, वाड्याच्या संस्कृतीत ब्राह्मण कुटुंबाचे संस्कार झालेल्या, मुंबईत लग्न होऊन आलेल्या, अजून मुंबईची पुरती ओळख न झालेल्या स्त्रियांनाही त्यांनी आपल्या कथेचे विषय बनविले. ('अननस').

नव्या भोगवादी संस्कृतीत मुंबईसारख्या मोठ्या शहरातील स्त्री–पुरुष संबंध आणि त्यामधील सेक्सचा विचार ह्या गोष्टी कशा नवीन अर्थ घेऊन येतात हेही त्यांनी आपल्या कथांचे प्रमुख आशयसूत्र बनविलेले दिसते. ('तीन तऱ्हा', 'चेटूक').

कथेत घटना आणि पात्रे हे दोन महत्त्वाचे घटक असतात आणि हे दोन घटक मिळून कथानकाची निर्मिती होत असते. पात्र हे कथानकाचा घटक जरी असले तरी त्याचे भावविश्व मानवी भावविश्वाशी विशिष्ट पातळीवर नातेसंबंध निर्माण करीत असते. पात्र म्हणजे एखाद्या व्यक्तीची उक्ती, कृती, वृत्ती, भावना, विचार, कल्पना, संवेदना, जीवनदृष्टी, जीवनपद्धती इत्यादींच्या चित्रणातून या

व्यक्तीची निर्माण होणारी शब्दरूप प्रतिमा होय.[२]

नवकथाकारांनी निरनिराळ्या वयोगटातील निरनिराळ्या वृत्तीची, समाजातल्या वेगवेगळ्या स्तरातील माणसांना आपल्या कथेचे विषय बनविले. नवकथापूर्व काळात पात्रचित्रणात ही विविधता नव्हती. नवकथाकारांनी मानवी मनाच्या अंतरंगात शिरून तेथील सुप्त हालचालीचा वेध घेतला. व्यक्तीचा मानसिक, भावनिक, सामाजिक पातळीवर असंतुलितपणे .वावर, त्यांच्या भावजीवनातील वेगवेगळ्या काळातील व प्रसंगातील भावनिक उद्रेक नवकथाकारांनी आपल्या पात्रचित्रणातून चित्रित केला.

गाडगीळांनी निरनिराळ्या परिस्थितीत सापडून निरनिराळ्या प्रसंगांना तोंड देणाऱ्या, त्याचप्रमाणे वेगवेगळ्या वातावरणात राहणाऱ्या पांढरपेशा मध्यमवर्गीय समाजाचे मोठ्या प्रमाणात चित्रण केलेले आहे. रूढी व परंपरेच्या पोलादी चौकटीत जे कायमचे बंदी होऊन बसले आहे, अशा व्यक्तींचे चित्रण करताना त्यांनी त्या व्यक्तींच्या अंतर्मनाचाच विचार केलेला दिसून येतो. ते पात्राचे स्वभावविशेष चित्रित करीत नाहीत तर त्यामागील मूळ मनोरचना चित्रित करतात. गाडगीळांच्या कथेतील पात्रचित्रणाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील विविधता. त्यात मास्तर आहेत, तसे कारकून आहेत, चाळकरी, गृहिणी, मुले, विद्यार्थी, म्हातारे लोक आहेत; पण गाडगीळांची खरी संस्मरणीय पात्रचित्रणे ही स्त्रियांची आहेत. यामध्ये विविध वयोगटातल्या स्त्रिया आहेत. तसेच उच्चमध्यमवर्गीय (उंच आणि लंबक, लक्तरे), मध्यमवर्गीय (साठा उत्तराची कहाणी, अननस), निम्न मध्यमवर्गीय (भागलेला चांदोबा, पिवळा गुलाब) स्त्रियाही आहेत. त्याचप्रमाणे प्रौढ कुमारिका, विधवा, घटस्फोटिता, परित्यक्ता, बंडखोर, एखाद दुसऱ्या वेश्या व बलात्कारिताही आहेत. नोकरी, करणाऱ्या, नोकरी न करणाऱ्या, आपल्या मादक तारुण्याने पुरुषांना मोहित करणाऱ्या, लैंगिक सुखाचा स्वैरपणे उपभोग घेणाऱ्या, पैशाला लालचावलेल्या, विशिष्ट परिस्थितीमुळे लैंगिक सुखाला पारख्या झालेल्या, आत्मभान जागृत झालेल्या पण पुरुषी वर्चस्वामुळे दबणाऱ्या, लहान लहान सुखाला पारख्या झालेल्या अशा अनेक स्त्रियांचे पात्रचित्रण गाडगीळांनी कथांतून केलेले आहे. आणि त्यातही त्यांनी त्यांच्या मनालाच प्राधान्य दिलेले आहे. त्यांच्या पात्रचित्रणात विविधता असली तरी दुःखाने पिचून गेलेल्या स्त्रियांचेच पात्रचित्रण त्यांच्या कथेत अधिक उठावदार झालेले आहे. (भागलेला चांदोबा, सरळ रेषा, तुटलेली).

गाडगीळांनी प्रौढ कुमारिकांचे जे चित्रण केलेले आहे, त्यातही वेगळेपण आहे. त्यांच्या मनातील विविध गंड, त्यांच्या मनोविकृती त्या चित्रणातून स्पष्ट होते. पात्रचित्रण करताना त्यांनी पात्राचे बाह्यरूप, शरीरवर्णन याला अवाजवी महत्त्व न देता, त्यांच्या शारीरिक हालचाली, लकवी, त्यांची अनुभव घेण्याची पद्धत, जीवनविषयीचे विचार यात एकसंधपणा साधून त्या व्यक्तीचे जे व्यक्तिमत्त्व बनते, त्याला महत्त्व दिले. 'चेटूक' कथेतील वसुंधरेच्या शारीरिक हालचाली, लकबीचे त्यांनी असे हुबेहुब चित्रण केले आहे की, ते वाचून ती खरोखरच पुरुषांवर चेटूक करणारी स्त्री वाटते. 'कडू आणि गोड' कथेत थोरली विधवा जाऊ अन्नपूर्णा भिंतीला चिकटून, तोंडात लुगड्याचा बोळा कोंबून, कानावर हात ठेवून मुलाला चाललेली मारपीट मुकाट्याने पाहात राहते; पण त्याच वेळी तिचे शरीर हुंदक्यांनी गदगदत असते, डोळ्यातून टिपे

ओघळत असतात. या तिच्या शारीरकि हालचालीवरून तिचे दुःख, तिची असहाय्यता, तिची अगतिकता दिसून येते.

गाडगीळांच्या पात्रचित्रणात विविधता तर आहेत, पण त्याचे एक पात्र दुसऱ्यासारखे नाही. विधवा असूनही 'चुंबन' मधील निर्मला वेगळी आहे. तर 'कडू आणि गोड' व 'ज्वाला' मधील विधवा वेगळीच आहे. बंडखोर स्त्रियांमध्येही 'उंट आणि लंबक', 'साठा उत्तराची कहाणी', 'अननस', 'अभद्र' आणि 'कोण जाणे' यांचे वेगवेगळे व्यक्तिमत्त्व आहे.

गाडगीळांच्या कथेतील स्त्रियांची चित्रे अतिशय वेधक आणि उत्कट आहेत. त्यातही दुःखाने पिचून गेलेल्या स्त्रियांच्या चित्रणात गाडगीळ जास्त रंगलेले दिसून येतात. तर आधुनिक, नोकरी करणाऱ्या, स्वैरपणे वागणाऱ्या, पैशाला दैवत मानणाऱ्या स्त्रियांच्या चित्रणात एक प्रकारची उपरोधिकता आढळून येते.

गाडगीळांच्या एकूणच स्त्रीपात्रांचा विचार केला तर असे निदर्शनास येते की, त्यांनी हिंदू समाजात मध्यमवर्गीय स्त्रीचे अनेक परींनी जे शोषण होते, त्यात शारीरिक शोषणाबरोबरच जे मानसिक शोषण होते त्याचे चित्र अतिशय तन्मयतेने रंगविलेले दिसून येते. त्या चित्रणातून असे आढळून येते की, गाडगीळ विशेषता गुंतलेले आहेत ते मानवी भावसंबंधात.


## संदर्भ सूची :-

1. गंगाधर गाडगीळ : खडक आणि पाणी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, द्वितीय आवृत्ती 1966.
2. डॉ. छाया नाईक : एकान्ताचा अंतर्नाद : अरविंद गोखले यांच्या कथांचा चिकित्सक आढावा, निकेता प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती 1999.
3. कथा–विमर्श–मुंबई–मराठी साहित्य संघ प्रकाशन 'साहित्य पुस्तकरूप' एप्रिल, मे, जून 1987, संजीव मुद्रणालय, पुणे.
4. वा. ल. कुळकर्णी : वाङ्मयीन दृष्टी आणि दृष्टिकोन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, 1959
5. सुधा जोशी (संपादक) : निवडक गंगाधर गाडगीळ, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, तृतीयवृत्ती, 2009
6. गंगाधर गाडगीळ : एका मुंगीचे महाभारत, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
7. इंदुमती शेवडे : मराठी कथा : उगम आणि विकास, सोमैय्या प्रकाशन, सुधारित आवृत्ती 1982
8. गंगाधर गाडगीळ : कडू आणि गोड, मेनका प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती 1980
9. गंगाधर गाडगीळ : एका मुंगीचे महाभारत भाग – 2, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृथमावृत्ती 1993
10. ना.सी.फडके : लघुकथा : मंत्र आणि तंत्र, अंजली प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती 1952
11. माधव आचवल : गंगाधर गाडगीळ यांचे कथालेखन – एक अभ्यास, सत्यकथा, मार्च 1958
12. प्रभा गणोरकर (संपादक) : गंगाधर गाडगीळ : व्यक्ती आणि सृष्टी
13. गंगाधर गाडगीळ : तलावातले चांदणे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती 1980

ISSN 2250-169X

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education For All Subjects

# VISION RESEARCH REVIEW



CHIEF EDITOR

DR. BALAJI KAMBLE

IMPACT FACTOR
6.20

ISSN 2250-169X

*International Registered & Recognized*
*Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# VISION RESEARCH REVIEW

UGC APPROVED, REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue - XIX, Vol. - II
Year - VII, Bi-Annual(Half Yearly)
(June 2020 To Nov. 2020)

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382 -241913
9423346913 / 7276301000
9637935252 / 9503814000

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@ gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published By :**
**Jyotichandra Publication**
Latur, Dist. Latur - 413531. (M.S.)

Price : ₹ 200/-

**CHIEF EDITOR**

Dr. Balaji G. Kamble
Professor & Head,
Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur. (M.S.)India.

**SPECIAL EDITOR**

Dr. E. Sivanagi Reddy
'Sthapathi'
Dept of Archaeology & Museums,
Hyderabad (A.P.)

**EXECUTIVE EDITORS**

Dr. Sachin Napate
Pune, Dist. Pune M.S

Verena Blechinger Talcott
Director, Dept. of History
& Cultural Studies, University of Barlin
Bariln. (Jermany)

Michael Strayss,
Director,
International Relation & Diplomacy,
Schiller International University,
Paris. (France)

Dr. Deelip S. Arjune
Professor, Head, Dept. of History
J. E. S. Mahavidyalaya,
Jalna, Dist. Jalna (M.S.)

Dr. Nilam Chhangani
Dept. of Economics,
S.K.N.G. College,
Karanja Lad. Dist. Sashim(M.S.)

Dr. Rajendra R. Gawhale
Head, Dept. of Economics
G.S. College
Khamgaon, Dist. Buldana (M.S)

**DEPUTY EDITORS**

Dr. Rajendra Ganapure
Professor,Head, Dept. of Economics,
S. M. P. Mahavidyalaya,
Murum. Dist. Osmanabad (M.S.)

Dr. B. K. Shinde
Professor. Head. Dept. of Economics
D. S. M. Mahavidyalaya,
Jintur, Dist. Parbhani (M.S.)

Dr. Vijay R. Gawhale
Head, Dept. of Commerce
G.S. Mahavidyalaya,
Khamgaon, Dist. Buldana (M.S.)

Bhujang R. Bobade
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Institute, Hyderabad (A.P.)

Dr. Mahadeo S. Kamble
Dept. of History
Vasant Mahavidyalaya
Kaij. Dist. Beed (M.S.)

Dr. S. R. Patil
Professor, Dept. of Economics,
Swami Vivekanand Mahavidyalaya,
Shirur Tajband, Dist. Latur(M.S.)

**CO - EDITORS**

Dr. Allabaksha Jamadar
Professor, Head, Dept. of Hindi
B.K.D. College,
Chakur, Dist. Latur (M.S.)

Dr. Murlidhar Lahade
Dept. of Hindi,
Janvikas Mahavidyalaya,
Bansarola, Dist. Beed (M.S.)

Dr. Shyam Khandare
Dept. of Sociology
Gondawana University,
Gadhciroli, Dist. Gadchiroli (M.S.)

Dr. M. Veeraprasad
Dept. of Political Science,
S.K. University
Anantpur. Dist. Anantpur (A.P.)

Issue : XIX, Vol. II
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 6.20
ISSN 2250-169X
June 2020 To Nov. 2020

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | Synthesis of Chalcones Using Amberlite Resin<br>**Gayatri Phadnaik** | 1 |
| 2 | Importance of patents and copyrights in higher education<br>**C. P. Kothawale** | 6 |
| 3 | Plagiarism and Higher Education<br>**Dr. Dadasaheb Jogdand** | 11 |
| 4 | Agricultural Growth in India<br>**Dr. S. K. Pagar** | 15 |
| 5 | Growth Performance of Oilseed Crops : A Case Study of Marathwada Region<br>**Dr. R. D. Ganapure** | 19 |
| 6 | समाज से उपेक्षित किन्नरों का यथार्थ जीवन<br>**डॉ. अशोक विश्वनाथ अंधारे** | 27 |
| 7 | एकूण कर्जवाटपाबाबत अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची महाराष्ट्रातील इतर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांशी तुलना (संशोधन कालावधी १९९४-९५ ते २००३-२००४)<br>**सुनिल हरीभाऊ पांडे** | 32 |
| 8 | ईशान्य भारतातील लोकसंख्या आणि उत्पन्नविषयक स्थिती<br>**डॉ. हेमलता गणेशराव ढगे** | 37 |
| 9 | महाराष्ट्रातील सहकारी चळवळी पुढील आव्हाने<br>**डॉ. दिपक शृंगारे** | 43 |
| 10 | कथा: एक वाङ्मयप्रकार<br>**डॉ. साधना द. जाधव** | 49 |
| 11 | डॉ. वि. बा. प्रभुदेसाई यांच्या भाषा अभ्यासाचे स्वरुप<br>**इराप्पा म. गुरव** | 55 |
| 12 | शीतयुध्दोत्तर काळातील भारताच्या परराष्ट्र धोरणाचे विश्लेषण<br>**डॉ. एस. व्ही. शेटे** | 61 |

**10**

# कथा: एक वाङ्मयप्रकार

**डॉ. साधना द. जाधव**
सहयोगी प्राध्यापक (मराठी)
एच.बी.टी. कला वाणिज्य महाविद्यालय,
नवीन सुभेदार ले-आऊट, नागपूर

## Research Paper - Marathi

'कथ' म्हणजे सांगणे, निवेदन करणे, या कथपासून 'कथा' हा शब्द आला. प्राचीन मराठी वाङ्मयात सर्वप्रथम कथा आली ती पद्यातूनच. आख्यान काव्य, खंडकाव्य, कथाकाव्य, पोवाडे, लावण्या अशा अनेक काव्यप्रकारातून कथेचा जन्म झाला. प्राचीन वाङ्मयप्रकारातही, महानुभाव वाङ्मयातील 'दृष्टांत पाठ' या ग्रंथाच्या रूपाने कथा जन्माला आलेली होती. लोककल्याण आणि मनोरंजन करण्याचे कार्य कथेखेरीज कोणत्याच वाङ्मय प्रकारात आढळून येत नाही. चिऊ–काऊच्या भाषेपासून ते तत्त्वज्ञानाची भाषा मनोरंजकतेने बोलण्याचे सामर्थ्य कथेजवळ आहे. त्यामुळे 'कथा' ही इतर वाङ्मयप्रकारापेक्षा वेगळी ठरते.

प्रा. दा. वि. कुळकर्णी कथा या वाङ्मयप्रकाराबद्दल विचार मांडताना म्हणतात, "जागतिक वाङ्मयाचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, आदिकापासून कोणत्या ना कोणत्या स्वरूपात 'कथा' हाच वाङ्मयप्रकार पायाभूत आहे. म्हणजे 'कथा' ही एका उपजत अशा नैसर्गिक प्रवृत्तीशी निगडित असून तो एक मूलभूत असाच वाङ्मयप्रकार ठरला आहे."[1]

दैवतकथा, अद्भुतकथा, प्राणिकथा म्हणजे नीतिकथा, बोधकथा असे प्रामुख्याने लोककथा वाङ्मयाचे म्हणून कथेची संकल्पना एकोणिसाव्या शतकातच जन्माला आली.

काही संस्कृत साहित्याचार्यांनी कथेच्या व्याख्या केलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे :

**रूद्रट** : "कथेची प्रारंभी देवता आणि गुरू यांना वंदन केले असले पाहिजे. त्यानंतर लेखकाने स्वतःचा व स्वतःच्या काव्यकथेचा परिचय करून दिला पाहिजे आणि मग कथालेखनाचा उद्देशही सांगितला पाहिजे." काव्यालंकार 16.20.23[2]

**अभिनवगुप्त** : "आख्यायिकोच्छ्वासादिना वक्त्रापरवक्त्रा दिनाच युक्ता। कथा तद्विरहिता।"[3]

अभिनवगुप्ताने कथा आणि आख्यायिका यात फरक केला असून त्याच्या मते आख्यायिका ही उच्छ्वासात असते. तीत पद्यबंध असतात. वक्त्र व अपवक्त्र वृत्ते असतात. पण कथेत तसे काही नसते.

कथेत एक सुरेख गोष्ट असून ती गद्यात असते. ती आर्यावृत्तात असते. यत्रतत्र वक्त्र अवपक्त्र वृत्ते असतात. कथेची सुरुवात पद्यातून केलेल्या नमनाने होते. त्यात खल-दुष्टांचा निर्देशही असतो.[4]

या कथेच्या व्याख्यांवरून असे निदर्शनास येते की, कथा ही गद्य व पद्य अशी दोन्ही स्वरूपात असते.

लघुकथेची आदर्श व्याख्या म्हणून प्रा. ना. सी. फडके, एडगर ॲलन पो. यांची पुढील व्याख्या देतात.

It is a piece of fiction dealing with a single incident, material of spiritual that can be read at one sitting and it is original, it must sparkle, exicite, or impress, and it must have a unity at effect or impression, it must move in an even line form its exposition to its close. (कघुकथालेखन : तंत्र आणि मंत्र)"[5]

प्रा. ना. सी. फडके यांचीही लघुकथेची व्याख्या एडगर ॲलन पो यांच्या व्याख्येशी जुळणारी आहे.

"कमीत कमी पात्रांच्या व प्रसंगांच्या साह्यानं व एकच एक संस्कार होईल अशा धोरणानं थोडक्यात व परिणामकारक रीतीने जी सांगितली जाते ती लघुकथा."[6]

इंग्रज लघुकथाकार बेटस् म्हणतो,

"The short story can be anything that the author decides it shall be."[7] म्हणजेच लघुकथेला कोणत्याही विषयाचे वावडे नसून लघुकथेचा विषय हा सर्वस्वी लेखकाच्या मर्जीवरच अवलंबून असतो.

प्रेमचंद (सुप्रसिद्ध हिंदी कथा लेखक) कथेविषयी 'कुछ विचार' मध्ये म्हणतात, "अनुभूतियाँही रचनाशील भावनासे अनुरंजित होकर 'कहानी' बन जाती है"

"सबसे उत्तम कहानी वह होती है जो किसी मनोवैज्ञानिक सत्यपर आधारित हो."[8]

प्रा. गंगाधर गाडगीळ लघुकथा लेखकाविषयी म्हणतात, "लघुकथा लेखकाविषयी एवढेच ध्यानात ठेवायचे की, जीवनाच्या ढिगाऱ्यात तो आपला हात खुपसतो आणि मग वाचकापुढे मूठ उघडून म्हणतो –"ही पाहा जीवनातील मोलाची भावसत्य"[9]

**कथेची घटकतत्त्वे :**

कथा हा वाङ्मयप्रकार छोट्यांपासून ते मोठ्यांपर्यंत आवडीचा आहे आणि ती अधिकाधिक लोकप्रिय होत आहे आणि त्यामुळेच कथालेखक आणि वाचक यांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत आहे. कथेचे स्वरूप हे स्वयंभू, आकर्षक आणि सुंदर असे आहे आपल्या जीवनाचा एक कोपरा कथेने व्यापून टाकलेला आहे. कथेने मानवी  जीवनाचे सर्व प्रश्न हाताळलेले दिसून येते. त्यात अगदी

सोप्या प्रश्नापासून ते अतिशय गुंतागुंतीने विषयही असतात. त्यामुळेच कथा हे साहित्याचे अभिन्न अंग आहे. या संदर्भात 'पाच कथाकार' या संग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेत वि. स. खांडेकर म्हणतात, "केवळ एक कलात्मक वाङ्मयप्रकार म्हणूनच नव्हे तर, जीवनाचे अत्यंत सूक्ष्म, सरस व सर्वांगीण चित्रण करणारा साहित्यविभाग म्हणून लघुकथेला अधिक मानाचे स्थान मिळत जाणार आहे. वाचकाप्रमाणे लेखकातही तिची लोकप्रियता वृद्धिंगत होत आहे. हृदयातल्या लहानमोठ्या आंदोलनाच्या आविष्काराने उत्कृष्ट माध्यम या दृष्टीने सर्व देशांतले प्रतिभावंत तिचा वाढत्या प्रमाणात आश्रय करीत आहे."[10]

कथेचे स्वरूप, तिचे विषय, तिचे तंत्र हे इतर वाङ्मयप्रकारापेक्षा वेगळे असल्यामुळे कथालेखकाला कथेच्या घटकतत्त्वाचे ज्ञान व अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यासाठी कथेच्या घटकतत्त्वाचा प्रामुख्याने विचार करावा लागेल.

कथावस्तू, पात्रचित्रण, स्वभावचित्रण, भाषाशैली, संवादशैली आणि कथेचा आशय या कथेच्या घटकतत्त्वाचा विचार कथालेखन करताना करावा लागतो.

**कथावस्तू :**

कथेला कोणताही विषय वर्ज्य नाही. कथा अनेक विषयांवर लिहिल्या जाऊ शकते. पशूपक्षांपासून ते अगदी विज्ञानापर्यंत कथाबीज गवसू शकते. प्रतिभावंत लेखक रोजच्या आयुष्यात घडणाऱ्या प्रसंगातूनही संघर्षात्मक कथाप्रसंगत निवडून कथानिर्मिती करू शकतो. म्हणूनच ना. सी. फडके म्हणतात, "सामान्यतलं असामान्य, नित्यातल अपूर्व म्हणजेच लघुकथेचा विषय."[11]

आरंभ, मध्य आणि शेवट या तीन गोष्टी कथेच्या कथानकाच्या मांडणीसाठी अत्यावश्यक असतात. कथेचा 'आरंभ' हा वाचकांचे कुतूहल आणि उत्सुकता निर्माण करणारा असावा, की जेणेकरून वाचक ती कथा वाचायला प्रेरित होईल. त्याचप्रमाणे कथेचा 'मध्य' ही कथानकातील संघर्षाने कलाटणी देणारा असावा, कारण कथानकाचा मध्य हा उत्कर्ष बिंदू असतो. आणि तो कथेची उत्सुकता वाढविण्याचे काम करीत असतो.

कथेचा शेवट हा कथा पूर्ण होण्याचा अंतिम टप्पा आहे. कथेचे कथानक एका उत्कर्षबिंदूला पोहचले की, कथेचा शेवट फार ताणता कामा नये. कथेचा शेवट विषयाला अनुसरून स्वाभाविक असावा.

कथेला शीर्षकही महत्त्वाचा आहे. 'शीर्षक' म्हणजे एका अर्थी कथेचा आरसाच आहे.[12] असे शीर्षकाच्या संदर्भात प्रा. दा. वि. कुळकर्णी म्हणतात. शीर्षक लहान चांगले, आकर्षक आणि मर्मज्ञ, खुबीदार असावे. त्याचप्रमाणे शीर्षक हे वाचकांची जिज्ञासा व कुतूहल वाढविणारे असावे. तसेच कथेच्या विषयाला अनुसरून असावे.